(महाराष्ट्र शासनाने स्थापिलेले)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापुर धरणाजवळ, गंगापुर,
नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी क्रमांक : (०२५३) २२३१७१४, २२३१७१५,२२३१७१६,२२३०७१८,
website : http://ycmou.digitaluniversity.ac, www.ycmou.ac.in

जा.क्र.: आविशा/परिषद/२०१५/

दिनांक : २४/०२/२०१५

**विषय :** आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषद बैठक - इतिवृत्त

महोदय,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेची (School Coucil) बैठक दिनांक १० जानेवारी २०१५ रोजी मुख्यालयातील शैक्षणिक इमारतीतील संगणक हॉल येथे पार पडली. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठवित आहोत.

सहकार्याच्या अपेक्षेसह....

संचालक
आरोग्य विज्ञान विद्याशाखा

**सोबत :** १) दि.१० जानेवारी २०१५ च्या बैठकीचे इतिवृत्त

**प्रति : -**

१) डॉ.अभय पाटील, सहायक प्राध्यापक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा
२) प्रा.विजया पाटील, प्र.संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
३) प्रा.प्रमोद खंदारे, प्र.संचालक, संगणक विद्याशाखा
४) प्रा.चेतना कमळसकर, सहायक प्राध्यापक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
५) प्रा.राम ठाकर, सहायक प्राध्यापक, निरंतर शिक्षण विद्याशाखा
६) डॉ.राजेंद्र सुधाकर भांबर, एम.फार्म, प्राचार्य पंचवटी फार्मसी कॉलेज, नाशिक
७) डॉ.सुरेश विठ्ठलराव महाजन, एम.डी. पॅथ, प्राध्यापक, एन.डी.एम.व्ही.पी. वैद्यकिय महाविद्यालय, नाशिक१०
८) श्रीमती. विद्युत राजहंस, एम.ऑप्टो, एम.ई.एस, कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्री, पुणे
९) डॉ.विश्वास सापतनेकर, एम.एस.जनरल सर्जन, FISPARS, MISHRS, ठाणे
१०) श्रीमती मालती डोंगरे, मेयो हॉस्पिटल, नर्सिग कॉलेज, नागपुर

Scanned with CamScanner

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## आरोग्य विज्ञान विद्याशाखा

प्रति,

सर्व सन्माननीय सदस्य, आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषद,

य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेची बैठक दिनांक १० जानेवारी रोजी दुपारी १२.०० वाजता शैक्षणिक इमारतीतील संगणक हॉल येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

१) डॉ.जयदिप निकम अध्यक्ष व संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा

२) डॉ.अभय पाटील, सहायक प्राध्यापक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा

३) प्रा. विजया पाटील, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

४) प्रा.प्रमोद खंदारे, संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा

५) प्रा.चेतना कमळस्कर, सहायक प्राध्यापक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

६) प्रा.राम ठाकर, सहायक प्राध्यापक, निरंतर शिक्षण विद्याशाखा

७) डॉ.राजेंद्र सुधाकर भांबर - प्राचार्य,पंचवटी फार्मसी कॉलेज, नाशिक

८) डॉ.सुरेश महाजन - प्राध्यापक व विभाग प्रमुख, डॉ.वसंतराव पवार वैद्यकिय महाविद्यालय, नाशिक

०९) श्रीमती विद्यूत राजहंस - प्राचार्य, एम ई एस कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्री, पुणे

१०) श्रीमती मालती डोंगरे, मेट्रन नर्सिग विभाग, मेयो हॉस्पीटल, नागपुर

११) डॉ.प्रकाश पालवे, वरिष्ठ सल्लागार, आरोग्य विज्ञान विद्याशाखा (निमंत्रित सदस्य)

१२) डॉ.उदय महाजन, वैद्यकिय अधिकारी व सल्लागार, आरोग्य विज्ञान विद्याशाखा (निमंत्रित सदस्य)

खालील सदस्य अनुपस्थित होते.

१) डॉ. विश्वास सापतणेकर, सापतणेकर हॉस्पिटल, लालबहादुर शास्त्री मार्ग, ठाणे

## विषय पत्रिका

सर्व प्रथम नवोदित सदस्यांचे स्वागत व परिचय करण्यात येवून बैठकीला सुरूवात करण्यात आली. बैठकीत पुढील विषयांवर चर्चा होवून निर्णय घेण्यात आले.

**विषय क्रबी-०१/२०१५/०१ - दिनांक ३० ऑगस्ट २०१३ रोजी झालेल्या आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे ...**

आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेची दिनांक ३० ऑगस्ट २०१४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे इतिवृत्त सर्व सन्माननीय सदस्यांना पाठविण्यात आले. या बैठकीतील इतिवृत्तास मान्यता मिळण्याची शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे. (सहपत्र क्र.०१)

**ठराव :**दिनांक ३० ऑगस्ट २०१४ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्त आणि त्यावर केलेले कार्यवृत्त याला मंजुरी देण्यात आली.

Scanned with CamScanner

**विषय क्रबी-०१/२०१५/०२ - आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासकेंद्राच्या निकषात बदल करणेबाबत...**

आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या प्रमाणपत्र, पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या नविन अभ्यासकेंद्र मागणीचे प्रस्ताव विद्याशाखेत येत असतात. सदर नविन अभ्यासकेंद्राच्या जुन्या निकषात बदल करणे आवश्यक आहे. उदा.केंद्राच्या जागेबाबत, आधुनिक साधनसामुग्रीबाबत काळानुरूप बदल होणे आवश्यक आहे अशी शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे. (सहपत्र क्र.०२)

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या प्रमाणपत्र, पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या नविन अभ्यासकेंद्र देण्याच्या निकषात सुचविलेल्या बदलानुसार मान्यता देण्यात आली.

**विषय क्रबी-०१/२०१५/०३ - आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत येणाऱ्या Diploma in Industrial Science (Pharmaceutical), Diploma in Pharma Manufacturing & Packaing व B.Sc. Industrial Drug Science (IDS) ह्या शिक्षणक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून अंतिम (Annual) परिक्षा Online पध्दतीने सुरू करणेबाबत....**

आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या Diploma in Industrial Science (Pharma), Diploma in Pharma Manufacturing & Packaing व B.Sc. Industrial Drug Science (IDS) सदर शिक्षणक्रमांचे अभ्यासकेंद्र (Lupin Ltd, Cipla Ltd, Wockhardt Ltd) येथे कार्यरत असून इतर शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्रापेक्षा दूर व वेगळे आहे. अभ्यासकेंद्राच्या मागणीनुसार वरील शिक्षणक्रमाच्या अंतिम परिक्षा Online पध्दतीने घ्यावी अशी शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे.

Academic

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या Diploma in Industrial Science (Pharma), Diploma in Pharma Packing & Manufacturing व B.Sc. Industrial Drug Science (IDS) या शिक्षणक्रमाच्या अंतिम परिक्षा Online पध्दतीने घेण्यास मान्यता देण्यात आली. सदर शिक्षणक्रमाच्या प्रश्नपेढी (Question Bank) तयार कराव्यात असे सुचित करण्यात आले.

**विषय क्रबी-०१/२०१५/०४ - आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत येणाऱ्या D.M.L.T/ B.Sc.(MLT) व MPH ह्या शिक्षणक्रमाच्या सध्या सुरू असलेल्या प्रवेश परिक्षा (Entrance Exam) Online पध्दतीने सुरू करणेबाबत....**

आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या D.M.L.T, B.Sc.(MLT) व Master of Public Health या शिक्षणक्रमाच्या प्रवेश परिक्षा Online पध्दतीने करण्याबाबत अभ्यासकेंद्राकडून मागणी होत आहे. त्यापैकी Master of Public Health ह्या शिक्षणक्रमांचे एकमेव अभ्यासकेंद्र मुख्यालयात आहे. अभ्यासकेंद्राच्या मागणीनुसार सदर शिक्षणक्रमाच्या प्रवेश परिक्षा Online पध्दतीने करण्यात याव्यात अशी शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे..

Academic

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या D.M.L.T, B.Sc.(MLT) व Master of Public Health या शिक्षणक्रमाच्या सध्या सुरू असलेल्या प्रवेश परिक्षा (Entrance Exam) Online पध्दतीने करण्यास मान्यता देण्यात आली. सदर शिक्षणक्रमाच्या प्रश्नपेढी (Question Bank) तयार कराव्यात असे सुचित करण्यात आले.

**विषय क्रबी-०१/२०१५/०५ - B.Sc (Optometry) या शिक्षणक्रमाच्या पॅटर्न पध्दतीत बदल करणेबाबत...**

आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या B..(Optometry) या शिक्षणक्रमाच्या नावात बदल केल्याने (पूर्वीचे नाव B.Sc.Optometry)UGC च्या नियमान्वये सध्याच्या पटर्न मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. (सोबत असलेल्या सहपत्रानुसार) नविन पॅटर्न पध्दत स्विकारण्याबाबतची शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे. (सहपत्र क्र.०३)

Academic

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या B..(Optometry) या शिक्षणक्रमाच्या नावात बदल केल्याने (पूर्वीचे नाव B.Sc.Optometry)UGC च्या नियमान्वये सध्याच्या पटर्न मध्ये सुधारणा व नविन पॅटर्न पध्दत स्विकारण्याबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. Changes in Syllabus : १) Assement and Distribution of appropriate credit points per subject २) Redistribution of subjects / topics per term ३) Deletion of topic which are outdated and are non relevant. ४) Additinal of topic upto २०% as per Advance & rescent requisits/requirements.



Scanned with CamScanner

**विषय क्रबी-०१/२०१५/०६ - आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या शिक्षणक्रमांच्या नविन अभ्यासकेंद्रांच्या केंद्र तपासणी शुल्क व सलंग्नता शुल्कात वाढ करण्यास मान्यता मिळणेबाबत.....**

आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या सर्व शिक्षणक्रमांच्या नविन अभ्यासकेंद्रांच्या केंद्र तपासणी शुल्क व अनामत रक्कमेत वाढ करणे आवश्यक आहे. सदर दर हे आठ - नऊ वर्षापूर्वीचे असून तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शिक्षणक्रमनिहाय वाढ करण्याची शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे) (सहपत्र क्र.०४)

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या सर्व शिक्षणक्रमांच्या नविन अभ्यासकेंद्रांच्या केंद्र तपासणी शुल्क व अनामत रक्कमेत वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच मा.कुलगुरूंच्या आदेशान्वये सर्व विद्याशाखांच्या शुल्कात एकसमानता आणण्याबाबत निर्णयास अनुसरून कार्यवाही करावी.(सहपत्र क्र.०४ प्रमाणे)

**विषय क्रबी-०१/२०१५/०७ - आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या सर्व शिक्षणक्रमांच्या शुल्कात वाढ (FEES) करणेबाबत.....**

आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या सर्व शिक्षणक्रमांच्या शुल्कात शैक्षणिक वर्ष २०१६ पासून वाढ करण्याचे प्रस्तावित असून तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शिक्षणक्रमनिहाय नोंदणी शुल्क वाढ करण्याची शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे) (सहपत्र क्र.०५)

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या सर्व शिक्षणक्रमांच्या शुल्कात शैक्षणिक वर्ष २०१६ पासून वाढ करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच मा.कुलगुरूंच्या आदेशान्वये सर्व विद्याशाखांच्या शुल्कात एकसमानता आणण्याबाबत निर्णयास अनुसरून कार्यवाही करावी.( (सहपत्र क्र.०५ प्रमाणे)

**विषय क्रबी-०१/२०१५/०८ - आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या DOTA व B.Sc.(Optometry) या शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य विकसित करणेबाबत...**

आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या DOTA व B.Sc(.Optometry) या शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य विकसीत करण्याबाबत शिक्षणक्रम सल्लागार समिती गठित करण्यास व समितीतील बैठकीनुसार लेखक, आशय संपोदक, भाषा संपादक यांच्या नावांना मंजुरी मिळण्याची शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे) (सहपत्र क्र.०६)

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या DOTA व B.Sc(.Optometry) या शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य विकसीत करण्यास व शिक्षणक्रम सल्लागार समिती गठित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच समितीतील नावांना, लेखक, आशय संपोदक, भाषा संपादक यांच्या नावांना मान्यता देण्यात आली आहे.

**विषय क्रबी-०१/२०१५/०९ - आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत पुढील शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून पदव्युत्तर पदवी M.Sc.(Industrial Drug Science हा नविन शिक्षणक्रम सुरू करण्यास मान्यता मिळणेबाबत...**

आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून पदव्युत्तर पदवी **M.Sc. (Industrial Drug Science)** हा नविन शिक्षणक्रम सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. विद्याशाखेंतर्गत B.Sc (IDS) हा शिक्षणक्रम राबविला जातो. सदर शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्रांची सातत्याने नविन शिक्षणक्रम M.Sc((IDS) बाबत मागणी होत आहे.

१) **M.Sc.(Industrial Drug Science)**

वरील नविन शिक्षणक्रमांमुळे विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवीची संधी उपलब्ध होणार आहे. Lupin Ltd या कंपनीशी विद्यापीठाने संलग्न करारानुसार B.Sc (IDS) हा शिक्षणक्रम राबविला जातो. त्या विद्यार्थ्यांना सदर शिक्षणक्रम करता येवू शकेल. M.Sc.(Industrial Drug Science) हा नविन शिक्षणक्रम सुरू करण्याची मान्यता मिळावी अशी शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे. (सहपत्र क्र.०७)

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून पदव्युत्तर पदवी **M.Sc. (Industrial Drug Science)** हा नविन शिक्षणक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर शिक्षणक्रमासाठी सेमिस्टर पध्दत स्विकारावी असे विद्याशाखा परिषदेने सूचविले.



Scanned with CamScanner

**विषय क्रबी-०१/२०१५/१०** - **आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत पुढील शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून Diploma in Panchkarma Assistant हा नविन शिक्षणक्रम सुरू करण्यास मान्यता मिळणेबाबत...**

आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून Diploma in Panchkarma Assistant हा नविन शिक्षणक्रम सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. सदर शिक्षणक्रम सुरू करण्याबाबत विद्यार्थ्यांची व अभ्यासकेंद्रांची सातत्याने मागणी होत आहे.

१) **Diploma in Panchkarma Assistant**

वरील नविन शिक्षणक्रमांमुळे विद्यार्थ्यांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच या शिक्षणक्रमांमुळे विद्यार्थी संख्यासुध्दा वाढू शकते. सदर नविन शिक्षणक्रम सुरू करण्याची मान्यता मिळावी अशी शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे.. वरील नवीन शिक्षणक्रमामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे..(सहपत्र क्र.०८)

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून Diploma in Panchkarma Assistant हा नविन शिक्षणक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

**विषय क्रबी-०१/२०१५/११** - **आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या सर्व शिक्षणक्रमाच्या ज्या अभ्यासकेंद्रावर २०११ पासून सलग तीन वर्षासाठी एकही प्रवेश नाही (शुन्य प्रवेश) अशा अभ्यासकेंद्राना त्वरीत बंद करणेबाबत...**

आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या सर्व शिक्षणक्रमांच्या ज्या अभ्यासकेंद्रावर २०११ पासून सलग तीन वर्ष मिळून एकही प्रवेश नाही (शुन्य प्रवेश) अशा अभ्यासकेंद्रे बंद करण्याची शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे.

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या सर्व शिक्षणक्रमांच्या ज्या अभ्यासकेंद्रावर सलग तीन वर्षापासून एकही प्रवेश नाही (शुन्य प्रवेश) अशा अभ्यासकेंद्रे बंद करण्याची शिफारसीस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून मान्यता देण्यात आली.

**विषय क्रबी-०१/२०१५/१२** - **आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या सर्व शिक्षणक्रमाच्या प्राश्निक व परिक्षक यांच्या नावांना मान्यता मिळणेबाबत.....**

मुल्यमापन विभागाच्या अंतर्गत संज्ञापन पत्र दिनांक १६ डिसेंबर २०१४ च्या पत्रानुसार आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या सर्व शिक्षणक्रमांच्या प्राश्निक व परिक्षकांच्या नावांची यादी सहपत्र १३ नुसार मान्यता मिळावी अशी शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा करित आहे.

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखा राबवित असलेल्या सर्व शिक्षणक्रमांच्या प्राश्निक व परिक्षकांच्या नावांच्या यादीस (सहपत्र १३ नुसार) मान्यता देण्यात आली.

**विषय क्रबी-०१/२०१५/१३** - **ऐनवेळचे विषय**

१३.१ **आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत पुढील शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून Diploma in Hospital Assistant हा नविन शिक्षणक्रम सुरू करण्यास मान्यता मिळणेबाबत...**

आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून Diploma in Hospital Assistant हा नविन शिक्षणक्रम सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. सदर शिक्षणक्रम सुरू करण्याबाबत विद्यार्थ्यांची व अभ्यासकेंद्रांची सातत्याने मागणी होत आहे.

१) **Diploma in Hospital Assistant**

वरील नविन शिक्षणक्रमांमुळे विद्यार्थ्यांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच या शिक्षणक्रमांमुळे विद्यार्थी संख्यासुध्दा वाढू शकते. सदर नविन शिक्षणक्रम सुरू करण्याची मान्यता मिळावी अशी शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे...(सहपत्र क्र.०९)

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून Diploma in Hospital Assistant हा नविन शिक्षणक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली..

Scanned with CamScanner

१३.२ **आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत पुढील शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून Certificate in Accupressure (प्रमाणपत्र शिक्षणक्रम ६ महिने कालावधी) व Diploma in Accupressure ( पदविका शिक्षणक्रम १ वर्ष कालावधी) हे नविन शिक्षणक्रम सुरू करण्यास मान्यता मिळणेबाबत...**

आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून Certificate in Accupressure (प्रमाणपत्र शिक्षणक्रम ६ महिने कालावधी) व Diploma in Accupressure ( पदविका शिक्षणक्रम १ वर्ष कालावधी) हे नविन शिक्षणक्रम सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. सदर शिक्षणक्रम सुरू करण्याबाबत विद्यार्थ्यांची व अभ्यासकेंद्रांची सातत्याने मागणी होत आहे..

१) **Certificate in Accupressure व Diploma in Accupressure**

वरील नविन शिक्षणक्रमांमुळे विद्यार्थ्यांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच या शिक्षणक्रमांमुळे विद्यार्थी संख्यासुध्दा वाढू शकते. सदर नविन शिक्षणक्रम सुरू करण्याची मान्यता मिळावी अशी शिफारस आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेकडून करण्यात येत आहे...(सहपत्र क्र.१०)

**ठराव :** आरोग्य विज्ञान विद्याशाखेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासून Certificate in Accupressure व Diploma in Accupressure हा नविन शिक्षणक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

अध्यक्ष

आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषद

Scanned with CamScanner